




दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : ३०९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२० जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# 'मी पक्षप्रमुख पद सोडायला तयार' ; उद्धव ठाकरेंची राजीनाम्याची तयारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** शिवसेनेच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने मुंबईत दोन्ही शिवसेनेचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ९ पैकी ६ खासदार पक्षातून बाहेर पडल्याची चर्चा आहे. ते वेगळा गट स्थापन करुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. या घटनेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवं वादळ आलं आहे. या वादळात तग धरुन उभं राहणं हे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पक्षावर मोठं आव्हान आहे. या घडामोडींवर उद्धव ठाकरे आपली पहिली प्रतिक्रिया काय देणार? याकडे सर्वांचं लक्ष होतं. उद्धव ठाकरे यांनी अपेक्षेप्रमाणे या पक्षफोडीवरुन भाजप आणि शिंदे गटावर चौफेर टीका केली. पण याचवेळी त्यांनी शिवसैनिकांना भावनिक साद केली. ही साद घालत असताना त्यांनी मोठं वक्तव्य केलं. आपण पक्षप्रमुख पद सोडायला तयार आहोत, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मी आज शेवटी तुम्हाला विचारतोय. आजपर्यंत तुम्ही मला जपलंत कारण शिवसेनाप्रमुखांचा आदेश. शिवसेनाप्रमुखांनी जसं सांगितलं की, जसं तुम्ही मला जपलंत तसं उद्धवला सांभाळा. आदित्यला सांभाळा. तसं मी आज तुम्हाला सांगतोय. मी कसा आहे ते तुम्हाला माहिती आहे. माझ्या माणसाने माझ्यावर बोट दाखवलं तर मी एक क्षणही तिकडे राहणार नाही. म्हणून मी मुख्यमंत्रीपद सोडलं आणि 'वर्षा' बंगला सोडून 'मातोश्री' ला गेलो. त्यामुळे नाटक म्हणून मला कधी जमलेलं नाही. हे करण्याची गरज नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मला जर काही पाहिजे असतं तर आजसुद्धा मी विधान परिषदेत जावून बसलो असतो. पण मी नाही गेलो. म्हणून मी आज तुम्हाला सांगतोय. विचार करुन उत्तर द्या. शिवसेनेला ६० वर्षे पूर्ण झाली आहेत. गेली १२ ते १३ वर्षे नेतृत्वाची जबाबदारी सांभाळतोय. पण जे आरोप आज माझ्यावर होत आहेत, ते तुम्हाला खरे वाटत असतील तर तुम्ही मला सांगायचं, मी आता या पदावरुन पायउतार व्हायला तयार आहे, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं.

माझी एक अट आहे, सोन्यासारखी



शिवसेना चोराच्या आणि दरोडेखोराच्या हातात जाऊ द्यायची नाही. तुमच्यापैकी एक शिवसैनिक येऊ द्या. तो शिवसेना पक्षप्रमुख होईल. मला त्याचं कौतुक वाटेल. मला नेतृत्वाची हाव नाही. मी आता हे पद सोडायला तयार आहे. पण कुणी लाचार, गद्दार, भेसळयुक्त रक्ताचा माणूस माझ्यावर आरोप करत असेल तर त्याला उत्तर तुम्ही द्यायचं आहे, असं उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांना आवाहन केलं.

यावेळी शिवसैनिकांनी पक्षप्रमुख पद सोडू नका, असं आवाहन केलं. यानंतर उद्धव ठाकरेंनी भूमिका मांडली. मी डगमगलेलो नाही. मी खचणारा नाहीय. अनेक संकट, अनेक वादळं आली. मी पळणारा नाहीय. पहाडासारखा उभा राहीन. जबाबदारी स्वीकारेन. पण तुमचा जोपर्यंत विश्वास आहे तोपर्यंतच मी करेन. ज्यावेळेला तुम्हाला विश्वास वाटणार नाही त्यावेळी हे पद सोडल्याशिवाय राहणार नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

**पंजोबा सीताराम ठाकरेंनी प्लेगच्या साथीत योगदान दिल्याचा दाखला**

आमच्या घराण्याचा इतिहास तुम्हाला माहिती आहे. प्रबोधनकार ठाकरे यांच्यापर्यंतचा इतिहास तुम्हाला माहिती आहे. पण प्रबोधनकारांचे वडील सीताराम ठाकरे कुणाला माहिती आहे का? कुणालाच माहिती नाहीत. माहिती असतील कसे? कारण जसा करोना आला होता तसा त्यावेळेला प्लेग आला होता. त्यावेळी आमचं घराणं पनवेलमध्ये राहायचं. प्लेग म्हणजे काय लागला की गेला. कुणाला लागण झाली की निधन झालं. त्यावेळी मृतदेह वाहून नेण्यासाठी कुणाची तयारी होत नव्हती. तेव्हा प्रबोधनकारांचे वडील सीताराम ठाकरे आणि त्यांच्या मित्रमंडळींनी हे मृतदेह वाहण्याचं काम केलं. त्यामध्ये प्लेग होऊन ते गेले. आहे कुणाच्या घराण्याचा असा इतिहास? आमच्या अंगावर येता?, असे सवाल उद्धव ठाकरेंनी केले.

**उद्धव ठाकरेंचा पंतप्रधान मोदींना टोला**

हा विषय केवळ शिवसेनेचा नाहीय. शिवसेना का पाहिजे? एकतर शिवसेना हवी की नको? हा विषय सर्वांना करा. महाराष्ट्राने केला पाहिजे. ठिक आहे, मी जिल्हा परिषद निवडणुकीला नाही फिरलो. त्याचं कारण, माझे सस्थानिक नेते उभे राहिले पाहिजेत. त्यांच्या जीवावर तुम्ही शिवसेना स्थानिक पातळीवर सोपवणार आहात की नाही? की प्रत्येक वेळेला आपल्या देशाचे पंतप्रधान येतात, अगदी दूध संघाच्या निवडणुकीला आणि म्हणतात, भाईयो और बहनों..., असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

माझे स्थानिक लोकं आहेत कुठे? अरे तुम्ही आमदार, खासदार आहात. लढवा ना निवडणूक. लढा. पण ज्यावेळेला मराठवाड्यात आपत्ती आली होती, शेतकऱ्यांची जमीनच्या जमीन वाहून गेली होती. महापुरामध्ये घरे, भांडीकुंडी, वह्या-पुस्तके वाहून गेली. तेव्हा मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री कुणी आले नव्हते. मी आणि माझ्याबरोबर अंबादास दानवे, चंद्रकांत खैरे, सगळे आमदार-खासदार आणि शिवसैनिक मदतीला धावून गेले होते. मी मुख्यमंत्री होतो, हे सांगावं का लागतंय? कारण लोकं विसरतात. कुणीही न मागता, तीसुद्धा एकही प्रश्न न ठेवता शेतकऱ्यांची कर्जमुक्ती केली होती. १० रुपयांत शिवभोजन दिलं होतं. कोरोनामध्ये काय केलं होतं? ते तुम्हाला माहिती आहे, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

# पिक्चर अभी बाकी है! ऑपरेशन टायगरची चर्चा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** शिवसेनेच्या दोन्ही गटांचा ६० वा वर्धापनदिन सोहळा आज संपन्न होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा वर्धापनदिन सोहळा गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये संपन्न होत आहे. सेनेच्या वर्धापन दिनापूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या ९ पैकी ६ खासदारांनी त्यांची साथ सोडली. हे ६ खासदार शिंदेसेनेच्या वाटेवर आहेत. या ऑपरेशन टायगरबद्दल शिंदे नेमकं काय बोलणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. ठाकरेंची साथ सोडलेल्या ६ खासदारांच्या पक्षप्रवेशाची घोषणा शिंदे करणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचं लक्ष होतं.

ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है, अशा सूचक शब्दांत एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगरवर भाष्य केलं. माझ्या समोर बसलेले शिवसैनिक हीच माझी संपत्ती आहे. व्यासपीठावरील बसलेले सगळे नेते,



मंत्री, आमदार, खासदार हेच माझं ऐश्वर्य आहे, असं शिंदे म्हणाले. आज बऱ्याच जणांच्या नजरा आपल्याकडे लागल्या आहेत. मी नेमकं काय बोलणार, व्यासपीठावर कोण येणार, काय होणार, याची सर्वांना उत्सुकता लागली आहे. पण आज हा टायगर तुमच्या समोर उभा आहे. ये तो सिर्फ पिक्चर है, ट्रेलर अभी बाकी है, असं सूचक विधान त्यांनी केलं.

माझ्यासोबत शिवसेनेचे ४० आमदार आले. मी ते ६० केले. आज शिवसेनेचे ६० आमदार आहेत. शिवसेना राज्यातील दुसरा क्रमांकाचा पक्ष आहे. आज बाळासाहेब ठाकरे यांना आनंद होत असेल. ते स्वर्गातून आपल्याकडे पाहत असतील आणि आशीर्वाद देत असतील. बाळासाहेब केवळ नावात असून चालत नाही. तर ते कामात आणि विचारातही असावे लागतात. शिवसेना जमिनीचा तुकडा नाही. तो काळजाचा तुकडा आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे टीका केली.

काल परवापासून काही कुत्रे रोज भुंकत आहेत. कुत्रे झुंडीनं येतात. वाघ एकटाच येतो. कुत्रे भोगतात, टायगर शिकार करतो. आमची शिवसेना बाळासाहेबांचे विचार, धर्मवीर बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहे. माझ्या पाठीशी कोणीही गॉडफादर नव्हता. पण कार्यकर्त्याला आमदार, खासदार, मंत्री, अगदी मुख्यमंत्रीदेखील होऊ शकतो. हीच शिवसेनेची किमया आहे आणि हे केवळ शिवसेनेतच होऊ शकतं.

बाळासाहेब कायम म्हणायचे, शिवसैनिक हेच मोठं पद आहे. त्याला कोणीही हटवू शकत नाही. त्यामुळे शिवसैनिकाला जपलं पाहिजे. निवडणुकीत आवडता असलेला कार्यकर्ता नंतर नावडता होता कामा नये. कारण हेच कार्यकर्ते आपल्याला निवडून देत असतात, असे सल्ला त्यांनी उपस्थित नेत्यांना दिला.

## करमाळा बसस्थानकाची दुरवस्था उघड ! ना पाणी, ना शौचालय; महिला प्रवाशांचे प्रचंड हाल

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि१९, करमाळा :** चार जिल्ह्यांच्या मध्यभागी असलेल्या करमाळा एसटी बसस्थानकात प्रवाशांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. पिण्याचे पाणी नाही आणि सार्वजनिक शौचालयाचीही गैरसोय असल्याने प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

बसस्थानक अत्यंत प्रशस्त असून सोलापूर विभागातून अहिल्यानगर, नाशिक, धुळे, शिर्डी या लांब पल्ल्याच्या बसेस येथे थांबतात. मात्र येथे पिण्याच्या पाण्याची सोयच नाही. बाहेर गावचे असल्या कारणाने प्रवासी इथे पाणी पुरवठा व फेज होण्याची अपेक्षा करतात, पण येथे तशी सोयच नाही. त्यामुळे प्रवाशांना पैसे खर्च करून विकत पाणी घ्यावे लागते.

स्थानकातील सार्वजनिक शौचालये गेल्या कित्येक महिन्यांपासून बंद आहेत. यामुळे विशेषतः महिला प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. पुरुष प्रवासी उघड्यावर लघुशंका करतात, परंतु महिला प्रवाशांना कुचंबणा सहन करावी लागते. बाहेरगावचे प्रवासी असल्याने कोणी वेळेत व बस स्थानकात थांबतात त्यामुळे तक्रार करत नाहीत. याच गैरफायदा बस स्थानक व्यवस्थापन घेत आहे, असे स्थानिक नागरिक संजय घोलप यांनी सांगितले.

मराठवाडा, पश्चिम खान्देश या भागातून पंढरपूर या तीर्थक्षेत्री जिकणारी मंडळी मार्गे बस जातात. त्यामुळे मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या करमाळा एसटी स्थानकात पिण्याच्या पाण्याचा हौद बांधलेला आहे. पण त्या हौदात पाणी भरलेच जात नाही, यामुळे प्रवाशांना विकत पाणी घ्यावे लागते. करमाळा बस स्थानकात पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची गैरसोय होत असल्याने प्रवाशांकडून बस स्थानकातील सोयी-सुविधा उपलब्ध होण्याची गरज आहे. वारंवार मागणी करूनही आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष आहे, असे मनसे घेऊन तहान भागवावी लागत असल्याचे घोलप म्हणाले. लांब पल्ल्याच्या सर्वच बसेस करमाळा बस स्थानकात दहा ते पंधरा मिनिटे थांबतात, पण बस स्थानकातील महिला व पुरुष या दोन्ही स्वच्छतागृहे बंद असल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

# निवडुंगेवाडी तलाव खोलीकरणामुळे जलसाठ्यात होणार वाढ ; आम्ही टाकळीकर' जलसंधारणाचा दुसरा टप्पा प्रगतीपथावर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** दुष्काळी परिस्थितीशी सातत्याने सामना करणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर गावातील आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठाने लोकसहभागाच्या बळावर जलसंधारणाचा आदर्श निर्माण केला आहे. दिवसेंदिवस पाण्याची पातळी खोल जात आहे. याकरिता गावातील तलाव, केटीवेअर ओढ्यावरील सिमेंट बंधाऱ्याचे खोलीकरण व रूंदीकरण करणे आवश्यक होते. यासाठी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठाने ग्राम पंचायतमार्फत राज्य शासनासह अनेक सामाजिक संस्था प्रस्ताव दिले होते. यांस मान्यता मिळाल्याने नाम फाऊंडेशन व विविध संस्थांच्या माध्यमातून जलसंधारणाचे काम प्रगतीपथावर आहे.



या माध्यमातून टाकळी ढोकेश्वर पाणीदार करण्याचा संकल्प केला आहे. असे मत आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठाचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे व्यक्त केले.

गावातील ओढ्यावरील सिमेंट बंधाऱ्याचे खोलीकरण व रूंदीकरण करण्यात आले. सुमारे दोन किलोमीटर ओढ्याचे खोलीकरण करण्यात आले असून सध्या निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरणाचे काम प्रगतीपथावर असल्याने मोठ्या प्रमाणात पाणीसाठा निर्माण झाला असून याचा लाभ शेतीसह पिण्याच्या पाण्यासाठी होणार आहे.

या जलसंधारण चळवळीत ग्रामस्थ, विविध क्षेत्रातील युवक, उद्योजक, व्यवसायिक, नोकरदार स्वयंस्फूर्तीने योगदान देत आहेत.

आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब बांडे व क्रियाशील सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम प्रगतीपथावर सुरू आहे.

या जलसंधारण कामामुळे परिसरातील भूजल पातळीत वाढण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या प्रश्नावर मोठा दिलासा मिळणार आहे. ओढ्यातील झाडे, झुडुपे काढून खोलीकरण केल्यामुळे अतिवृष्टीच्या काळात पाण्याचा निचरा सुरळीत होणार आहे. त्यामुळे शेतात पाणी घुसणे, पिकांचे नुकसान होणे तसेच शेती वाहून जाण्याच्या घटना टाळण्यास मदत होणार आहे. ओढ्याच्या दोन्ही बाजूंना बांध घालून शेतकऱ्यांच्या येजा साठी रस्त्यांचीही निर्मिती करण्यात आली आहे. त्यामुळे पाणीप्रश्नासोबत ग्रामीण रस्त्याचाही प्रश्न मार्गी लागला आहे. टाकळी ढोकेश्वर परिसर हा कमी पर्जन्यमानाचा आणि वारंवार दुष्काळाचा सामना करणारा पठारभाग म्हणून ओळखला जातो. अशा परिस्थितीत जलसंधारणाच्या कामांमुळे पाणीसाठ्यात वाढ होत असून शेतीला नवसंजीवनी मिळात आहे. ओढा खोलीकरण, बंधारा मजबुतीकरण आणि पाणी आडवा पाणी जिरवा या संकल्पनेतून ग्रामीण भागातील विकासाला गती मिळत आहे. जलस्रोत वाढल्याने शेती व्यवसायाला चालना मिळून ग्रामीण अर्थकारणही मजबूत होत असल्याचे चित्र निर्माण होत आहे.



**– डॉ. बाळासाहेब बांडे**
**अध्यक्ष : आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान टाकळी ढोकेश्वर**

ग्रामविकासाच्या चळवळीत जलसंधारण कामाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. गावे पाणीदार झाले तरच तेथील लोकांचे जीवनमान समृद्ध होऊ शकते. म्हणूनच टाकळी ढोकेश्वर येथिल विविध क्षेत्रात कार्यरत भूमिपुत्र एकत्र आले तर कितीही मोठे लोकहिताचे काम उभे राहू शकते. टाकळी ढोकेश्वर येथिल आम्ही टाकळीकर चा हा जलसंधारण उपक्रम त्याचे उत्तम उदाहरण आहे. पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी लोकसहभाग हीच खरी ताकद आहे.




## दोन रुसले एक जेवेचिना...

एक लोकप्रिय भारूड आहे, ‘काट्याच्या अणीवर वसली तीन गावें, दोन ओसाड एक वसेचिना’. या भारुडाला आध्यात्मिक छटा आहेत. व्यवहारी अर्थाने बघतो म्हटले तर त्यात उपरोध दिसतो. घडता घडता कसे बिघडते ते दिसते. भारूड पुढे एका मडक्यापर्यंत येते आणि मग, ‘त्यात रांधले तीन मूग, दोन हिरवे एक शिजेचिना. तिथे आले तीन पाहुणे, दोन रुसले एक जेवेचिना’पर्यंत पोहचते. हे सगळे आठविण्याचे कारण म्हणजे, विधान परिषदेची निवडणूक. त्यात जे काही सगळे चालले आहे, त्या परिस्थितीशी भारुडातील वर्णन चपखल बसण्यासारखेच आहे.

काँग्रेसने संघटन सृजन अभियान राबवून सगळी टीम बदलली. नवे अध्यक्ष नेमले. जे सत्ताधाऱ्यांशी दोन हात करतील, दबावाला बळी पडणार नाहीत, अशांचीच निवड केल्याचे सांगितले गेले. त्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुका त्यांची परीक्षा होती. त्या अटीतटीच्या होतील असे वाटत असताना, इथेही पेपर फुटले. परीक्षक ‘सेट’ दिसले. यवतमाळचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी सुचविलेले उमेदवार साहेबराव कांबळेंनी माघारीच्या अंतिम दिवसाची वाट न बघताच माघार घेतली. शिंदेंच्या सेनेत दाखलही झाले. म्हणाले, ‘संख्याबळच नव्हते, नेत्यांचे सहकार्य नव्हते’. ते तर अर्ज भरतही नव्हते. अचानक त्यांना असा साक्षात्कार का झाला? झाला तर झाला, सगळ्या नेत्यांना सांगून माघार का घेतली नाही? भूतकाळात समृद्धी महामार्गावरून त्यांचा झालेला जलदगती प्रवास काँग्रेस नेत्यांनी, उमेदवारी देताना दुर्लक्षित केला की, जुने काँग्रेसी नेते सतीश चतुर्वेदी यांच्या मुलाला मदत करण्याच्या नादात जे घडत होते, ते घडू दिले असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. माणिकराव ठाकरे, शिवाजीराव मोघे, वसंत पुरके यांच्यासारखे दिग्गज नेते असताना ही नामुष्की यावी, निवडणूक अविरोध व्हावी हे अनाकलनीय आहे.

अमरावतीचे नाट्य तर मोठे मनोरंजक आहे. ऐन निवडणुकीत तेथील काँग्रेस उमेदवार प्रचार सोडून नागपुरातील हॉस्पिटलमध्ये दाखल झालेत. ते आयसीयूमधून निवडणूक लढत आहेत आणि तिकडे पक्षाच्या अपेक्षा ‘आयसीयू’त गेल्या आहेत. त्यांच्या अजारपणाचे वृत्त काँग्रेस नेत्यांना माध्यमातून कळले. नेत्यांनी उमेदवारावर टीकास्त्र सोडले. आरोप केले. उमेदवाराचे समर्थक म्हणतात, ‘नेत्यांच्या वाढत चाललेल्या मागण्यांमुळेच आमचा उमेदवार आजारी पडला. यशोमती ठाकूर, सुनील देशमुख यांच्यासारख्या दिग्गजांवर आपला उमेदवार आयसीयूमध्ये ठेवून वंचित आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा द्यायचा का, यावर विचार करण्याची वेळ आली आहे.

चंद्रपुरात काँग्रेसमधील सत्तेचा चंद्र गटबाजीच्या काळ्या ढगांत अखंड बुडालेला दिसतो. इथे काँग्रेसला विरोधकांची गरजच नाही. तेथील दोन गट एकमेकांवर असे तुटून पडतात, की विरोधकांना संधीच मिळत नाही. इथे उमेदवार ठरविण्यापूर्वीच काँग्रेसचे नगरसेवक सहलीला निघून गेले होते आणि काँग्रेसचे नेते आपल्याच सहकाऱ्यांवर आरोप करीत कुणी कुणाला किती पैसे दिले याचे हिशेब जनतेला सांगत होते. या भांडणामुळेच निवडणूक अविरोध झाली. भाजपच्या लखानींचा विधिमंडळ राजकारणात अरुणोदय झाला. या पराभवाचे कुठलेच वैषम्य काँग्रेसला नाही. भांडणे सुरूच आहेत. एका गटाने महापालिकेतील सत्तापक्ष नेताच बदलवून टाकला. दुसरा गट त्यावर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहेच.

नागपुरात भाजपची मते अधिक असल्याने संथ चाललेली निवडणूक ‘भाजपचे शटर बंद करीन,’ या काँग्रेस शहराध्यक्ष प्रफुल्ल गुडधे यांच्या घोषणेने रंगतदार झाली. भाजपने छोट्या पक्षांसह काँग्रेसच्या काहींना गळी लावण्याचे प्रयत्न चालविले आहेत. काँग्रेस एकत्र राहते की मतांचे लोंढे दुसरीकडे वाहतात हे बघायचे आहे. बिनविरोध निवडणुका झाल्या तिथे, याला काय ‘अर्थ’ म्हणत मतदार नाराज आहेत. कुठे उमेदवार नेत्यांची अपेक्षापूर्ती करताना दिसत नाहीय, तर कुठे नेते उमेदवारास मदत करताना आढळत नाहीय. रुसवाफुगवा कायम आहे.

**– अतुल पांडे**

# पाणी वाचावा – पाणीबाणी टाळा !

यापूर्वी कधीही न अनुभवलेला उकाडा यंदा राज्यातील नागरिकांना सहन करावा लागला. तारखेनुसार पावसाळा सुरु झाला असला तरी आज जून महिना अर्धा संपला तरी पावसाचा पत्ता नाही त्यामुळे राज्यातील नागरिकांसह पशु पक्षीही हैराण झाले आहेत. उष्माघाताने यंदा अनेक पशु पक्षांचा बळी घेतला. काहींच्या मते यंदा राज्यात अभूतपूर्व दुष्काळ अनुभवायला मिळणार आहे. भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. पाणी ज्याचे दुसरे नावच जीवन आहे.

पाण्याविना जगणे केवळ असह्य आहे. केवळ पिण्यासाठीच नव्हे तर कपडे धुणे, भांडी घासणे, दैनंदिन स्वच्छता यांसाठी पाण्याला पर्याय नाही. पाण्याचा एकमेव स्रोत म्हणजे पाऊस आणि तोच लांबल्याने पाणी पुरवठ्याची सर्व गणिते कोलमडू लागली आहेत त्यामुळे अनेक शहरी भागांत पाणी कपात सुरु आहे. काही भागांत एक दिवसाआड तर काही भागांत आठवड्यातून एकदा पाणी पुरवले जात आहे. वाढती लोकसंख्या, शहरांत सुरु असलेली विकासकामे यांमुळे उपलब्ध पाणी साठ्यावर प्रचंड ताण येत असतो.

उन्हाळा सुरु झाला की राज्य तसेच जिल्हा प्रशासनाकडून दरवर्षी पाणी वाचवण्याचे आवाहन करण्यात येते. आगामी काळात जगायचे असेल, तर आज पाण्याची बचत करणे अनिवार्य झाले आहे. बऱ्याचदा शेजारी पाजारी अन्य कोणी पाण्याची बचत करताना



दिसत नाहीत, मग मीच का पाणी वाचवावे, असे विचार मनात येतात: मात्र शेजारची व्यक्ती पैशाची उधलपट्टी करते म्हणून त्याचे पाहून आपण ती करत नाही, कारण पैशाचे महत्व, पैसे वाचवण्याचे महत्व, पैसे कमावण्यासाठी लागणारी मेहेनत याबाबतची जाण आपल्या प्रत्येकाला आहे. आज पाणी सहज उपलब्ध होत आहे याचा अर्थ भविष्यातही ते सहज उपलब्ध होईलच असे नाही. त्यामुळे पाण्याच्या बचतीचे महत्वही आपण लक्षात घ्यायला हवे. आपल्या लहान सहान कृतीतून पाण्याची बचत आपल्याला करता येते. पाणी वाचवणे म्हणजे अस्वछ राहणे असे मुळीच नव्हे,आपल्या दैनंदिन स्वच्छतेसाठी उदा. आंघोळ, तोंड धुणे, हात धुणे आणि अन्य स्वच्छतेसाठी किती पाणी आपण व्यय करतो हें प्रत्येकाला ज्ञात असते.

त्यामध्येही उन्हाळ्यात जर आपण शॉवरचा वापर करत असू तर बादलीचा वापर करून कित्येक लिटर पाणी आपण वाचवू शकतो, हात धुताना हाताला हँडवॉश अथवा साबण लावेपर्यंत आपण नळ चालूच ठेवत असू तर तो बंद करायला हवा. कपडे आणि भांडी धुतांनाही हाच नियम पाळूया. भांड्यांना साबण लावताना नळ बंद ठेवूया. पिण्यासाठी आवश्यक तेव्हढेच पाणी घेऊया, जेणेकरून पाणी पिऊन झाल्यानंतर पेल्यात उरलेले पाणी अन्यत्र टाकावे लागणार नाही. कपडे धुण्यासाठी आणि भांडी घासण्यासाठी शक्य असल्यास काही दिवस यंत्राचा वापर न करता हाताने धुण्याचा प्रयत्न करूया. घरातील एखादा नळ बिघाड झाल्याने त्यातून पाणी गळत असेल, तर तो तत्परतेने दुरुस्त करून घेऊया. झाडांना आवश्यक तेव्हढेच पाणी देऊया. एखाद्या ठिकाणी पाईपलाईनमधून पाण्याची गळती होत असेल तर त्वरित पाणी खात्याला कळवून त्या ठिकाणी दुरुस्ती करून घेऊया. पाणी वाचवण्याचे महत्व आपल्या घरातील लहानग्यांनाही सांगुया. आपण जर सोसायटीत राहत असू तर सोसायटीची मिटिंग घेऊन पाणी वाचवण्याचे प्रयत्न सामूहिकपणे करण्याचा प्रयत्न करूया ! पाण्याला जीवन असे म्हटले जाते. फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये महागडे जेवण जेवल्यानंतरही ते पचण्यासाठी जेवणांनंतर किमान ग्लासभर पाणी तरी आपल्याला हवेच असते. पाण्याविना जीवनाची आपण कल्पनाही करू शकत नाही. काही देशांमध्ये पाणीटंचाईमुळे इंधनाच्या दरात पाणी विकले जात असल्याच्या बातम्या आजवर आपण वाचल्या आहेत. आज आपण पाणी नाही वाचवले तर भविष्यात भारतातही अशीच परिस्थिती निर्माण होऊ शकते.

त्यासाठी पाणी वाचवण्याची सवय आतापासून अंगवळणी पाडूया ! ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे आणि ज्या प्रमाणात पाण्याचा व्यय होत आहे ते पाहता उपलब्ध जलसाठे दरवर्षी अपुरेच पडतात. गेल्या काही वर्षांचा अंदाज घेता हवामान खाते आणि पाऊस यांचे गणित कधी जुळताना दिसत नाही त्यामुळे यंदाही पुरेसा पाऊस पडेल याची काहीच शाश्वती नाही. राजकीय मंडळींकडून महाराष्ट्र राज्य समृद्ध पथावर असल्याचे कितीही सांगण्यात येत असले, तरी राज्याच्या काही भागांतील नागरिकांना दरवर्षी भीषण पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. ५–६ किलोमीटर अंतर पायपीट करून पाणी आणावे लागते. पाण्याच्या एका थेंबासाठी दरवर्षी कितीतरी पशु पक्ष्यांचा बळी जातो. भगवंताच्या कृपेमुळे आपल्याला पुरेसे पाणी मिळते त्याबद्दल आपण कृतदक्ष राहूया आणि आतापासूनच पाणी बचतीची सवय स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला लावून घेऊया जेणेकरून भविष्यात पाणीबाणी निर्माण झालीच तर तिचा सामना आपल्याला समर्थपणे करता येईल !

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# पक्षीतज्ज्ञ डॉ.सलीम अली




आज २० जून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे पक्षीतज्ज्ञ डॉ.सलीम अली यांचा आज स्मृतिदिन. २० जून १९८७ रोजी डॉसलीम अली यांचे निधन झाले होते. पक्षीतज्ज्ञ डॉ.सलीम अली यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८९६ रोजी मुंबईत एका गरीब मुस्लिम कुटुंबात झाला. त्यांचे पूर्ण नाव सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली असे होते. डॉ.सलीम अली हे एक वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे तर दोन वर्षाचे असताना आईचे निधन झाले.

अगदी बालवयातच आई वडिलांचे छत्र हरपलेल्या सलीम अलींचा सांभाळ त्यांच्या मामांनी केला. सलीम अली यांना लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड होती. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी गळ्यावर पिवळा डाग असलेली चिमणी विकत घेतली होती. हा पक्षी कोणता आहे ? त्याचे नाव काय आहे ? हे त्यांना माहीत नव्हते म्हणून ते माहीत करून घेण्यासाठी ते त्या चिमणीला घेऊन मामांकडे गेले मामांनी सरळ त्याला बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या संचालकाकडे घेऊन गेले.

तिथे संचालकांनी सलीम अलींना त्या पक्षाची सविस्तर माहिती सांगितली तसेच संस्थेतील भुसा भरलेल्या पक्षांचा संग्रह दाखवला. तो क्षण डॉ. सलीम अलींच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. त्या क्षणी त्यांच्यावर पक्षांची जी भुरळ पडली ती कायमचीच. त्यानंतर त्यांना पक्षी निरीक्षणाचा छंदच जडला. १९१३ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर डॉ सलीम अली यांनी सेंट झेव्हीयर महाविद्यालयात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला. लहानपणापासून पक्षी निरीक्षणाची आवड असल्याने सलीम अली यांनी उच्च शिक्षणासाठी प्राणी विज्ञान हा विषय निवडला. या विषयात त्यांना बी ए ऑनर्स ही पदवी मिळवली मात्र ही पदवी विद्यापीठाच्या समकक्ष समजली जात नव्हती त्यामुळे त्यांना भारतीय प्राणी वैज्ञानिक सर्व्हेक्षण संस्थेत नोकरी मिळू शकली नाही मात्र बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीत त्यांना व्याख्यता म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले तेथे जाऊन त्यांनी पक्षी शास्त्रावर प्रशिक्षण घेतले तिथे त्यांना जगप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ एर्व्हिन श्ट्रेझमन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर काही काळ त्यांनी इंग्लंडमध्येही काम केले.

१९३१ साली ते भारतात परत आले. परत आल्यावर त्यांनी बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपकार्यवाहक पद स्वीकारले. नंतर ते या संस्थेचे अध्यक्षही बनले. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या माध्यमातून त्यांनी हैदराबाद पक्षी निरीक्षण, त्रावणकोर – कोचीन पक्षी सर्व्हेक्षण, अफगाणिस्तान पक्षी सर्व्हेक्षण, कैलास पक्षी निरीक्षण यात्रा अशा मोहिमा राबवल्या. डॉ सलीम अली यांनी सुगरण पक्षाच्या वर्तनावर बारकाईने अभ्यास केला व त्यावर बिएनएचएस जर्नलमध्ये एक शोधनिबंध लिहिला. या शोध निबंधाने त्यांना पक्षी शास्त्रज्ञ म्हणून मान्यता मिळवून दिली. डॉ सलीम अली यांनी भारतभर फिरून विविध पक्षांची तपशीलवार माहिती गोळा केली. ती माहिती त्यांनी सर्वसामान्य नागरिकांना समजावी यासाठी पुस्तक रुपात लिहिली. त्यांनी लिहिलेल्या हँडबुक ऑफ इंडिया अँड पाकिस्तान व पिक्टोरियल गाईड या दहा खंडीय पुस्तकाने त्यांचे जगभर नाव झाले.

डॉ.डीलन रीलपे यांच्या साथीत त्यांनी अपार मेहनत घेऊन भारतीय पक्षांच्या बाराशे जाती, २१०० उपजातींच्या नोंदी, सवयी, शास्त्रशुद्ध सर्वांगीण माहिती चित्रांसाहित एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिली. डॉ सलीम अली यांच्या ह्याच कार्याने भारतात हौशी पक्षी निरीक्षक बनण्याची परंपरा निर्माण झाली. भारतातील पक्षी निरीक्षक डॉ सलीम अली यांना आद्य गुरू मानतात. त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला तसेच त्यांचा जन्मदिन पक्षीदिन म्हणून साजरा करण्याची घोषणा केली. डॉ सलीम अली यांचे २० जून १९८७ रोजी निधन झाले. डॉ.सलीम अली यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### ऑन लाईन

ऑन लाईन खरेदीची
आगळीअसते अकड
ऑर्डरफ्लेस करेफक्त
मुळीचं नसता निकड

बसल्या जागी उद्योग
कापला जातो बोकड
प्रत्येक गोष्ट हवी हवी
गळाठू जाईलं धाकड

रिप्लेस करायचे पुन्हा
घरात लावलीयं चवड
थकून जातो जीव बा
चालली सतत परवड

ओ टिपी देत बसायचे
घसा खरवडून ओरड
टोल फ्रीवर बोलताना
घशालालागली कोरड

स्वस्त स्वस्त म्हणतात
कसलीही करा निवड
लोभसवाणीजाहिरात
निर्माणकरणारं आवड

कार्डचेबील आल्यावर
अंगावर कोसळे दरड
इ एमआय लावून घ्या
वर्षभर कायमचेचिरड

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# पाणी हे जीवन ..... त्याची नासाडी थांबवा

जुने महिन्याचे जवळपास दोन तृतीयांश दिवस संपत आले आहेत. अजूनही महाराष्ट्रात मोसमी पावसाची सुरवात नाही. जेथून पाणी येते तेथील जवळपास सर्व धरणात सुद्धा पाण्याचे साठे कमी होत आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात पाऊस कमी किंवा न झाल्यास मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. अनेक शहरात विहरी किंवा बोअरवेल्स हे नाहीत किंवा असल्यास त्याचा उपयोग होत नाही. त्यामुळे शहरात पाण्याची तीव्र टंचाई असे होणार आहे. त्यासाठी आत्तापासूनच काही उपाय योजावे लागतील प्रत्येक माणसाने पाणी वाचविण्याचा प्रयत्न करावयास हवा.

- ✻ नळ सोडून काम करू नका
- ✻ नळ सोडून इतर कामात व्यग्र राहू नका
- ✻ पाणी कमी वापरा
- ✻ वापरलेले पाणी झाडांना घाला
- ✻ अंगणात किंवा रस्त्यावर पाणी मारू नका
- ✻ कार धुताना दररोज धुवू नका त्यासाठी वापरलेले पाणी वापरा
- ✻ बाटलीतील पिण्याचे पाणी ओतू नका
- ✻ पाण्याची गळती थांबवा



- ✻ अनेक शहरात पाणी दररोज दिले जाते ते एक दिवसाआड देणे सुरु करा
- ✻ अंघोळी साठी पाणी कमी वापरा

एकदा का पाऊस पडला व धरणात थोडा साठा तयार झाला कि परिस्थिती सुधारेल. तो पर्यंत पाणी हे जीवन आहे हे विसरता काम नये.

**– शांताराम वाघ, पुणे.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## प्राथमिक शाळा हाच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खरा पाया – बा.ठ.झावरे

### वासुंदे शाळेत नवगत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** शिक्षण हाच ग्रामीण भागाच्या विकासाचा खरा पाया आहे. जिल्हा परिषद शाळेत ग्रामपंचायत प्रशासन, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक आणि ग्रामस्थांनी एकत्रित येऊन केलेले हे नवागतांचे स्वागत कौतुकास्पद आहे. जेव्हा संपूर्ण गाव आणि शाळा मिळून प्रयत्न करतात, तेव्हाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि शाळेच्या सक्षमीकरणासाठी आम्ही सर्व स्तरांतून सदैव कटिबद्ध राहू. असे मत श्री गुरुदत्त मल्टीस्टेट पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष बा. ठ. झावरे पाटील यांनी व्यक्त केले आहे.

पहिल्याच दिवशी नवीन कपडे, नवीन दप्तरे घेऊन लगबग करत नवीन विद्यार्थ्यांचे शाळेत आगमन झाले. वासुंदे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये या नवागत विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात स्वागत करण्यात आले. प्राथमिक शाळा हा खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचा आणि शिक्षणाचा पाया समजला जातो. हाच पाया मजबूत करण्यासाठी आणि पहिल्याच दिवशी मुलांच्या मनात शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी, या उद्देशाने या स्वागत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या पहिल्या दिवशी आलेल्या चिमुरड्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळत होता. या विशेष कार्यक्रमासाठी वासुंदे गावच्या गुरुदत्त पतसंस्थेचे चेअरमन बा.ठ. झावरे, गावच्या सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, पी.डी.बर्वे, बापूसाहेब गायके उपस्थित होते.

तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पोपट हिंगडे, पा. ल. बर्वे, हरिभाऊ गायखे, शालेय व्यवस्थापन सदस्या कावेरी झावरे, केंद्रप्रमुख श्री.लोंढे, शाळेच्या मुख्याध्यापिका सुनिता रोहकले, सहशिक्षिका शेळकंदे, जाधव आणि पवार आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षिकांनी व व्यवस्थापन समितीने विशेष परिश्रम घेतले. पहिल्याच दिवशी झालेल्या या सुंदर स्वागतामुळे विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस अत्यंत संस्मरणीय ठरला.

## अपर तहसील कार्यालयाच्या मागणीसाठी बोरी ग्रामस्थांचे मुंडण आंदोलन



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.१९, बोरी (परभणी) :** बोरी येथे मंजूर अप्पर तहसील कार्यालय तातडीने सुरू करण्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांनी 'मुंडण आंदोलन' करत प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. बोरी येथील राष्ट्रमाता जिजाऊ चौकात गेल्या ६ दिवसांपासून सुरू असलेल्या धरणे आंदोलनादरम्यान दिनांक १८ जून रोजी सायंकाळी हे सामूहिक मुंडण आंदोलन करण्यात आले. शासनाने मंजूर केलेले अपर तहसील कार्यालय लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे, या प्रमुख मागणीसाठी बोरी आणि परिसरातील ग्रामस्थांचे आंदोलन आता अधिक तीव्र झाले आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाचा निषेध नोंदविण्यासाठी सामूहिक मुंडण आंदोलन केले. राष्ट्रमाता जिजाऊ चौकात गेल्या १३ जून पासून ग्रामस्थांचे धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या सहाव्या दिवशी म्हणजेच दिनांक १८ जून रोजी सायंकाळी ग्रामस्थांनी एकत्र येत सामूहिक मुंडण केले आणि जोरदार घोषणाबाजी केली. या मुंडण आंदोलनात गावातील २८ प्रमुख ग्रामस्थांनी आणि तरुणांनी सक्रिय सहभाग घेतला. धरणे आंदोलनाला पाठिंबा म्हणून बुधवारपासून ६ तरुण बेमुदत उपोषणाला बसले आहेत. मुंडण आंदोलन झाल्यानंतर सायंकाळी ग्रामस्थांनी गावातून एक भव्य रॅली काढली. आंदोलनाला दिवसभर बोरी परिसरातील शेकडो नागरिकांनी भेटी देऊन आपला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. जोपर्यंत कार्यालय प्रत्यक्ष सुरू होत नाही, तोपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार ग्रामस्थांनी केला आहे.

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त कर्जतमध्ये रक्तदान शिबीर



**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.१९, कर्जत (रायगड) :** शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त कर्जत शहर शिंदे सेनेच्या वतीने महात्मा गांधी हॉस्पिटल कामोठे – पनवेल यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ जणांनी रक्तदान केले. कर्जत शहरातील श्री शनी महाराज देवस्थानच्या रवी किरण सभागृहात कर्जत शहर शिंदे सेनेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम नगरसेवक किशोर कदम यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. या शिबिराला आमदार महेंद्र थोरवे यांनी भेट दिली. यावेळी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, माजी सभापती अमर मिसाळ, महेंद्र निगुडकर, सुरेखा शितोळे, नगरसेवक संकेत भासे, वैभव सुरावकर, कोयल कन्हेरीकर, जान्हवी देवघरे, रोहित ओसवाल, अशोक मोरे, प्रदीप वायकर, स्वप्नील जाधव आदी उपस्थित होते.

रक्त संकलनाचे काम महात्मा गांधी हॉस्पिटल कामोठे – पनवेलच्या डॉ.निखिल निगुडकर, डॉ.प्रज्ञा आगवणे, अभय फिरके, अलका हेमाडे, प्रियांका कुशवाह, हजरा खान, ऋतुजा खंडागळे, स्वप्नील सिनलकर यांनी केले. याप्रसंगी सुदेश देवघरे, आशिष वर्मा, रोहित बाफना, विक्रम ओसवाल, सौरभ केदारी, कौशिक वांजळे आदी उपस्थित होते.

# विकासाची वाट खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचविणार – दीपक लंके

## नांदूर पठार येथे मातोश्री शेतपाणंद रस्त्यांचे भूमिपूजन



> नांदूर पठारच्या सर्वांगीण विकासासाठी खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. शेतपाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना वर्षानुवर्षे भेडसावणाऱ्या अडचणी दूर होत आहेत. गावातील प्रत्येक वस्ती, शेतकरी आणि नागरिकांच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असून आगामी काळात ही विविध विकास कामे मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.
>
> **- रवींद्र राजदेव (नेते, टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गट)**

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागातील विकासकामांना प्राधान्य दिले जात आहे. शेतपाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होत असून नांदूर पठारमध्ये ही विकासाची गती कायम राहील. गावातील प्रत्येक घटकाला सोबत घेऊन अधिकाधिक विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न राहणार आहे, विकासाची वाट आता खेड्यापाड्यात पोहोचवायची आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दीपक लंके यांनी दिली.

पारनेर तालुक्यातील नांदूर पठार येथे लोकनेते खासदार निलेश लंके यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या मातोश्री शेतपाणंद रस्त्यांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते दीपक लंके यांच्या हस्ते शुक्रवार, दि.१९ जून २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या कार्यक्रमास टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाच्या नेत्या सोनियाताई रवींद्र राजदेव, खासदार निलेश लंके यांचे स्वीय सहाय्यक संदीप चौधरी, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव उद्योजक दिनेश घोलप यांची प्रमुख उपस्थिती होती.

नांदूर पठार गावात शेतपाणंद रस्त्यांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे २६ किलोमीटर रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतूक, शेतीकामे आणि दळणवळणासाठी मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामीण भागातील विकासाला चालना देणाऱ्या या कामांमुळे गावाचा चेहरामोहराच बदलल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी खासदार निलेश लंके यांनी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले. शेतकऱ्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी आणि गावागावांत विकासकामे पोहोचविण्यासाठी अशा योजनांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी रवींद्र राजदेव, सोनिया राजदेव, संदीप चौधरी, यांच्यासह कोरठण खंडोबा देवस्थान विश्वस्त चंद्रभान ठुबे, पोपट गुंड, निलेश लंके प्रतिष्ठान मुंबई अध्यक्ष दिनेश घोलप, शंकर चिकने, भानुदास आंग्रे, ॲड. सूर्यकांत वलवे, प्रकाश राजदेव, बाळासाहेब चौधरी, माधव आंग्रे, दत्तात्रय चौधरी, जयराम चौधरी, शिवप्रसाद दिवेकर, शशिकांत आंग्रे, रमेश घोलप, शंकर आंग्रे, बबन घोलप, राजाराम राजदेव,ताराबाई राजदेव, छाया पानसरे, भरती चौधरी, रोहिणी चौधरी, कचराबाई पानसरे, चंद्रभान राजदेव आणि बदामबाई राजदेव यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जीएसटी मुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर – पालकमंत्री डॉ.उईके

## वस्तू व सेवा कर इमारतीचा लोकार्पण सोहळा



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ०१ जुलै २०१७ पासून देशात वस्तु व सेवा कर (जीएसटी) ही एकच करप्रणाली लागू केली आहे. या सुलभ कर पध्दतीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडत असून आज चंद्रपूर येथे वस्तु व सेवा कर विभागाच्या उत्तम इमारतीचे लोकार्पण होत आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी केले. वस्तु व सेवा कर नूतन इमारतीचे लोकार्पण करतांना ते बोलत होते.

यावेळी मंचावर वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, चंद्रपूर शहराच्या महापौर संगिता खांडेकर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, करण देवतळे, जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, मनपा आयुक्त अकुनुरी नरेश, अपर राज्यकर आयुक्त विजय डांगे, राज्यकर सहआयुक्त विनोद गवई आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ.उईके म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था भक्कम होत असून आपले राज्य पुढे जात आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री उपस्थित राहणार होते. मात्र मुंबईमध्ये महत्वाच्या बैठका असल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने मी आणि राज्यमंत्री ॲड. शेलार येथे उपस्थित आहोत. आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या दूरदृष्टीमुळे चंद्रपूर येथे वस्तु व सेवा कर विभागाची उत्तम इमारत तयार झाली, असेही त्यांनी सांगितले.

**देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात चंद्रपूरचे योगदान : वित्त राज्यमंत्री ॲड. जयस्वाल**

चंद्रपूर हा उद्योग, वनसंपदेने नटलेला तसेच आर्थिक संपन्न जिल्हा आहे. या जिल्ह्याने नेहमीच सरकारच्या तिजोरी करीता चांगले उत्पन्न दिले आहे. देशाच्या आणि महाराष्ट्राच्या विकासात चंद्रपूरचे योगदान महत्वाचे आहे, असे वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड आशिष जयस्वाल यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री यांनी 'विकसीत भारत – २०४७' चा रोडमॅप तयार केला असून आपल्या राज्याचे महत्वाचे योगदान राहणार आहे. चंद्रपूर आणि गडचिरोली हे जिल्हे आता विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहेत. गडचिरोलीचे उत्पन्न पहिल्या ५ जिल्ह्यात आणण्याचा मुख्यमंत्र्यांचा संकल्प आहे. या इमारतीचे उत्कृष्ट बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाने केले असून त्यासाठी ते अभिनंदनास पात्र आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात राज्यकर सहआयुक्त विनोद गवई म्हणाले, सदर इमारत ही चार मजली आहे. इमारतीच्या बांधकामासाठी एकूण २९ कोटी ९९ लक्ष ८० हजार रुपये खर्च झाले आहे. सदर इमारत ही चंद्रपूर विभागाचे मुख्यालय असून या अंतर्गत चंद्रपूर, वर्धा व गडचिरोली हे तीन जिल्हे येतात.

आर्थिक वर्ष २०२५–२६ या कालावधीत चंद्रपूर विभागाने सुमारे १४५० कोटी इतका जी.एस.टी.महसूल गोळा केला. लक्षांक पूर्ततेच्या टक्केवारीत १२२ टक्के लक्षांक पूर्ती करत चंद्रपूर जिल्ह्याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तत्पुर्वी मान्यवरांच्या हस्ते नुतन इमारतीच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. तसेच फित कापून सर्व मान्यवरांनी इमारतीची पाहणी केली. कार्यक्रमाचे संचालन दिनेश मासोदकर आणि ऐश्वर्या भालेराव यांनी केले. यावेळी राज्यकर सहआयुक्त संजय पवार, प्रशांत पाटील, संजय सायगण, सहा.राज्यकर आयुक्त तेजराम मडावी, भुषण शहाणे, संतोष हेमणे आदी उपस्थित होते.

# बिअर शॉपी बंद करा; आमदाराचे पोलील अधिक्षकांना निवेदन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, चंद्रपूर :** बिअर शॉपीच्या प्रकरणामुळे चंद्रपूर शहरातील जगन्नाथ बाबा वार्डात नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. वैष्णवी अपार्टमेंमधील दोन बिअर शॉपी कायमस्वरुपी बंद करण्याच्या मागणीसाठी आ.सुधाकर अडबाले यांनी पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांची भेट घेऊन निवेदन दिले. वाहतूक कोंडी, अपघात आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

आ.सुधाकर अडबाले यांनी चंद्रपूर पोलिस अधीक्षक आयुष नोपानी यांची भेट घेऊन चंद्रपूर येथील जगन्नाथ बाबा वॉर्ड मधील वैष्णवी अपार्टमेंटमध्ये असलेले पि. जे. बिअर शॉपी तसेच पी. जी. बिअर शॉपी हे दोन्ही दुकाने कायमचे बंद करण्याबाबत चर्चा करून निवेदन दिले.

चंद्रपूर येथील जगन्नाथ बाबा वार्ड येथील वैष्णवी अपार्टमेंटमध्ये असलेले पी.जे.बिअर शॉपी तसेच पी.जी.बिअर शॉपी हे मागील ३ ते ४ वर्षांपासून सुरू आहे. सदरहू बिअर शॉपीमध्ये देशी तसेच विदेशी दारू भरपूर प्रमाणात विकत असतात. सदरहू शॉपीचे समोर सकाळी ५ वाजेपासून १२ वाजेपर्यंत देशी तसेच विदेशी दारू मिळत असल्यामुळे मद्य शौकिनांच्या रांगा लागलेल्या असतात.

रविवार तसेच बंद असलेल्या दिवशी तर फारच गर्दी राहते. दोन्ही बिअर दुकानाचे समोर मद्य शौकीन रोडवर आपली वाहने ठेवतात. त्यामुळे वाहतूक विस्कळीत होत असतात. यामुळे मागील हप्त्यात एका महिलेचा अपघात होऊन ती जखमी झाली. हे दोन्ही दुकान सोसायटीची परवानगी नसतांना सुध्दा जबरदस्तीने सुरू आहे. तसेच दोन्ही दुकानदारांनी बेकायदेशीरपणे दुकानाच्या समोर टिनाचे शेड टाकून अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे सदर दोन्ही बिअर शॉपी कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी नागरिकांनी पोलिस अधीक्षकांकडे केली आहे.

पोलिस अधीक्षक यांनी यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असे सांगितले. तसेच जिल्हाधिकारी वसुमना पंत यांना सदर मागणीचे निवेदन देण्यात आले.

सदर दोन्ही बिअर शॉपी दुकाने कायमचे बंद करण्याबाबत राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांना भेटून बिअर शॉपी बंद करण्याबाबत मागणी करणार असल्याचे आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितले. यावेळी नगरसेवक पप्पू देशमुख, सिनेट सदस्य प्रा.दिलीप चौधरी व मोठ्या संख्येने रहिवासी उपस्थित होते.

